## <u>विशेष दिवाणी दावा क्र.४१९/२०२३ मधील निशाणी क्र. २३ खालील आदेश</u>.

**( मे. अवदुत एजन्सीज तर्फे कैलास महाबळेश्वरकर वि. ए टू झेड इन्फ्रा सर्व्हीस लि. आणि इतर )**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (येथून पुढे थोडक्यात "दिवाणी संहिता" असे संबोधण्यात आलेले आहे) चा आदेश ७ नियम ११ (ड) नुसार दावा फेटाळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीने निशाणी २८ येथे त्याचे म्हणणे देऊन अर्जास आक्षेप घेतलेला आहे.

०३. मी वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा तोंडी युक्तीवाद ४५ मिनिटांपर्यत ऐकुन घेतला आहे. प्रतिवादीचे विधिज्ञांनी त्यांचा लेखी युक्तीवाद निशाणी ३० येथे दाखल केलेला आहे. त्याचे मी अवलोकन केलेले आहे.

०४. प्रतिवादीचे अर्जात थोडक्यात असे कथन आहे की, प्रस्तुत दावा दाखल करण्यास कारण पुणे येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात घडलेले नाही, प्रस्तुतचा दावा हा व्यवसायिक स्वरुपाचा असल्यामुळे व्यावसायिक न्यायालय कायदा, २०१५ मधील कलम १२–अ प्रमाणे वादीने दावा दाखल करण्यापुर्वी मध्यस्थीची कार्यवाही न केल्यामुळे तो फेटाळण्यास पात्र आहे, दावा दाखल करण्यास कारण घडलेले नाही इत्यादी कारणामुळे दावा फेटाळण्यास पात्र आहे.

०५. वादीने त्याच्या म्हणण्यामध्ये असे कथन केलेले आहे की, दाव्याच्या विषयाची किंमत रु. ५०,००,०००/– पेक्षा कमी असल्यामुळे तो व्यावसायिक न्यायालय कायदा मधील विशिष्ट रक्कमेच्या स्वरुपाच्या पेक्षा कमी असल्यामुळे सदर कायद्याच्या तरतुदी या ठिकाणी लागू होत नाहीत. प्रस्तुत न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात दावा दाखल करण्यास कारण घडलेले आहे. दावा दाखल करण्यास घडलेले कारण दाव्याच्या परिच्छेद क्र. १९ मध्ये नमुद केलेले आहे. अंतिमतः त्याने अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

०६. उभय पक्षाच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादात अर्जातील व म्हणण्यातील कथने परत प्रतिपादन केलेली आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी ती मी या ठिकाणी नमुद केलेली नाहीत. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ **१. मे. पाटील**

**ॲटोमेशन प्रा.लि. वि. रखेजा इंजिनिअर्स प्रा.लि. २०१३ ऑल एससीआर ९८** या न्यायनिवाडयाचा आधार घेतलेला आहे.

०७. मी वर उल्लेखीत न्यायनिवाडयाचे अवलोकन केलेले आहे. त्यामधील न्यायतत्वाचे सार असे आहे की, व्यवसायिक न्यायालय कायदा कलम १२–अ मधील मध्यस्थीची तरतुद बंधनकारक असुन त्या तरतुदीचे वादीने पालन करणे आवश्यक आहे व त्याचे पालन न केल्यास तो दावा दिवाणी संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे फेटाळण्यास पात्र आहे.

०८. प्रस्तुतचा दावा व्यावसायिक स्वरुपाचा आहे की नाही याबाबत प्रथमतः प्राथमिक निष्कर्ष नोंदविणे आवश्यक आहे. मी दाव्याचे अवलोकन केलेले आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी कंपनीला त्याने दाव्यातील नमुद वस्तुंचा पुरवठा केला असुन त्यापोटी त्याला व्याजासहीत रु. ४७,६२,१३२/– येणे बाकी आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांचे नोटीफीकेशन क्र. एसपीसी १३१९/१६२/सि.आर ३६/आयएक्स दि. ०३/०७/२०१९ नुसार मा. बॉम्बे उच्च न्यायालयाशी सल्लामसलत करुन व्यावसायिक न्यायालय कायदा कलम ३–अ प्रमाणे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे व्यावसायिक वाद प्रकरणे चालविण्याचे अधिकार क्षेत्र रु. ५०,००,०००/– निश्चित केलेले आहे. प्रस्तुतचा वाद ४७,६२,१३२/– रुपयांचा आहे. त्यामुळे तो व्यावसायिक वाद याच्या व्याख्येत निश्चित रक्कमेच्या स्वरुपात येत नाही. म्हणून प्रतिवादीच्या विधिज्ञांनी वर उल्लेखीत विश्वास व्यक्त केलेल्या न्यायनिवाडयातील वस्तुस्थिती प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती पेक्षा भिन्न असल्यामुळे तो न्यायनिवाडा प्रतिवादीस मदत करणारा नाही असे मी नम्रपुर्वक नमुद करीत आहे.

०९. वादी कंपनी पुणे येथे कार्यरत आहे. प्रतिवादी हे मुंबई येथे कार्यरत असल्याचे दिसुन येत आहे. दावा चल रक्कमेच्या वसुली संदर्भात आहे. वादीने मालाचा पुरवठा पुणे येथुन केल्याचे दाव्यातील कथनांवरुन दिसुन येत आहे. त्यामुळे दिवाणी संहिता कलम २०(क)

नुसार दावा दाखल करण्यासाठी अंशतः कारण पुणे येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात घडलेले असल्यामुळे या न्यायालयास प्रस्तुतचा दावा चालविण्याचा अधिकार आहे.

१०. वादीने दावा दाखल करण्यास घडलेले कारण दाव्याच्या कलम १९ मध्ये नमुद केलेले आहे. ते कारण खरे किंवा खोटे याची पडताळणी दिवाणी संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे आदेश पारीत करताना करता येऊ शकत नाही. त्यामुळे अर्जात प्रतिवादीने नमुद केलेले मुद्दे दावा फेटाळण्यासाठी गैरलागू असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by MALHAR POPATRAO SHINDE
Date: 2024.04.02 16:09:08 +0530

**ठिकाण– पुणे**
**दिनांक – ०२/०४/२०२४**

**(मल्हार पो. शिंदे)**
**११वे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,**
**पुणे.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | Shri. S. U. Javgude ( Grade II ) |
| Court Name | :- | Shri. M. P. Shinde<br>11th Jt Civil Judge Senior Division, Pune |
| Judgment/Order Date | :- | 02-04-2024 |
| Order Checked and signed by the Presiding Officer On | :- | 02-04-2024 |
| Order uploaded on | :- | 02-04-2024 |